आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

६ नोव्हेंबर २१०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देण्याच्या प्रधानमंत्री विद्यालक्ष्मी योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- भारतीय अन्न महामंडळात केंद्रसरकार दहा हजार सातशे कोटी रुपयांची नवी समभाग  गुंतवणूक करणार

- जगातली युद्ध थांबवणं हे आपल्या सरकारचं प्रमुख धोरण असेल अशी अमेरिकेत अध्यक्षपदी निवडून आलेले डोनाल्ड ट्रंप यांची घोषणा

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक प्रचाराचा धडाका/ विविध पक्षांच्या बड्या नेत्यांच्या जाहीर सभा

**आणि**

- काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जाहीरनामे प्रसिद्ध

**<><><><><>**

गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ मिळावं या हेतूनं पीएम विद्यालक्ष्मी योजनेला सरकारनं मंजुरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांना ही माहिती दिली. उच्च  शिक्षणासाठी आता विद्यार्थ्यांना विनातारण आणि  विना हमी कर्जपुरवठा होऊ शकेल, असं ते म्हणाले. आता विद्यार्थ्यांच्या शिक्षणाआड आर्थिक अडचणी येणार नाहीत अशी आशा त्यांनी व्यक्त केली. या योजनेचा लाभ ७ लाख विद्यार्थ्यांना मिळेल, अशी अपेक्षा आहे.

भारतीय अन्न महामंडळात दहा हजार सातशे कोटी रुपयांच्या नव्या समभाग गुंतवणुकीला मंत्रीमंडळानं आजच्या बैठकीत मान्यता दिली. महामंडळाच्या कार्याला बळ मिळावं, या उद्देशानं हा निर्णय घेण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. यामुळे व्याज

आणि अनुदानाचं ओझं कमी होईल. शेतकऱ्यांकडून हमीभावाने खरेदी, पुरेसा अन्नधान्य साठा राखणं,किमतीत स्थिरता राखणं अशा बाबतीत अन्न सुरक्षेच्या धोरणात महामंडळाची महत्त्वाची भूमिका असते.

<><><><><>

३ हजार सहाशे कोटी रुपयांच्या पीएम विद्यालक्ष्मी योजनेला कॅबिनेटनं मंजुरी दिल्यानं विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील आर्थिक अडथळे दूर होण्यास मदत होईल, असं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. ८ लाख रुपयांपर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांपर्यंतच्या शैक्षणिक कर्जावर ३ टक्के व्याजसवलत मिळणार आहे तर साडेसात लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर ७५ टक्के क्रेडिट गॅरंटी मिळणार आहे. देशात दरवर्षी सुमारे २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या गोव्याला भेट देणार आहेत. नौदलाच्या दर्यावर एक दिवस या कार्यक्रमात त्या सहभागी होणार आहेत. नौदलाच्या लढाऊ क्षमतेचं दर्शन घडवणाऱ्या कसरती आणि आएनएस विक्रांतवरुन झेपावणाऱ्या नौदल विमानांची प्रात्यक्षिकं यावेळी सादर होतील.

<><><><><>

जगातली युद्ध थांबवणं हे आपलं प्रमुख धोरण असेल, असं अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निवडून आलेले डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. विजयानंतरच्या पहिल्या भाषणात ट्रम्प यांनी अमेरिकेत स्थलांतरितांना अवैध मार्गानं येता येणार नाही या आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत २७७ इलेक्टोरल मतं मिळवून रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प विजयी झाले. हे जगातलं सर्वात भव्य पुनरागमन असल्याचं त्याच्या पक्षाचे उपाध्यक्षपदाचे उमेदवार जे डी वान्स यांनी म्हटलं आहे.

अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून ट्रम्प शपथ घेतील. पेनसिल्वेनिया, जॉर्जिया, नॉर्थ कॅरोलिना अशा दोलायमान समजल्या जाणाऱ्या राज्यांनी ट्रम्प यांच्या बाजूने कौल देत त्यांच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या विजयाबद्दल ट्रम्प यांचं अभिनंदन केलं आहे. यामुळं दोन्ही देशातली जागतिक आणि धोरणात्मक भागिदारी आणखी मजबूत होईल, असं प्रधानमंत्री म्हणाले.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज तेजी दिसली. अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परदेशी गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा घेतल्याने गेले दोन दिवस शेअर बाजारात घसरण दिसून येत होती. मात्र, आज अध्यक्षीय निवडणुकीचे निकाल जाहीर होत असताना त्यात तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्स निर्देशांकात आज ९०१ अंकांची वाढ झाली आणि तो ८० हजार ३७८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २७१ अंकांची वाढ होऊन तो २४ हजार ४८४ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

भारत - अमेरिका सैन्य सहकार्य समूहाच्या बैठकीची २१वी फेरी आज नवी दिल्लीत पार पडली. यात क्षमता उभारणी, प्रशिक्षणाचे आदानप्रदान, संरक्षण आणि उद्योग जगतातले सहकार्य आणि संयुक्त सराव अशा अनेक विषयावर या दोन दिवसीय बैठकीत चर्चा झाली. यात भारताच्या वतीनं लेफ्टनंट जनरल जे.पी. म्यॅथ्यू आणि अमेरिकेच्या वतीनं लेफ्टनंट जनरल जोशुआ रूड यांनी संयुक्तपणे अध्यक्षस्थान स्वीकारलं. भारत आणि अमेरिका या दोन्ही राष्ट्रात सैनिकी सहकार्य असायला हवं यावर दोघांचंही एकमत झालं.

<><><><><>

महाराष्ट्रा२पत्विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला आता केवळ १४ दिवस उरले असून विविध राजकीय पक्षांनी प्रचाराचा जोर लोवला आहे. सत्ताधारी आणि विरोधी आघाड्यांचा प्रचार आणखी तीव्र झाला असून दिग्गजांच्या प्रचारसभा होत आहेत.महाविकास आघाडीची संयुक्त प्रचारसभा आज मुंबईत वांद्रे- कुर्ला संकुलात होत आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, ज्येष्ठ नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे आणि मविआचे इतर नेते सभेला उपस्थित आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा पंचसूत्री जाहीरनामा यावेळी प्रसिद्ध करण्यात आला. महिलांना दरमहा तीन हजार रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या महालक्ष्मी योजनेचा तसंच बेरोजगारांना ४००० रुपये अर्थसहाय्याचा त्यात समावेश आहे. महिलांना मोफत बस प्रवास, रुग्णांना मोफत औषधं, अशी आश्वासनं राहुल  गांधी यांनी दिली. भाजपाप्रणित लोकशाही आघाडी सरकारच्या धोरण आणि कार्यक्रमांवर त्यांनी टीका केली. काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी आज नागपूर इथं संविधान संमेलनात सहभागी झाले होते.

प्रदेश काँग्रेसच्या निवडणूक प्रचार समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नेते चंद्रकांत हंडोरे यांची नेमणूक झाली आहे.

**<><><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याभोवती अर्बन नक्षलींचा गराडा पडल्यामुळे ते आता काँग्रेस विचारसरणीचे राहिले नसून, अतिडावे बनल्याची टीका, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ते आज एका मुलाखतीमध्ये  बोलत होते. भारतीय संविधानाची प्रत पारंपारिक निळ्या कव्हरमध्ये  असते, मात्र राहुल गांधी भारतीय संविधानाची प्रत लाल रंगाचं वेष्टन घातलेली का दाखवतात, असा प्रश्नही त्यांनी केला. भारत जोडो यात्रेत सहभागी झालेल्या १८० संघटना विध्वंसक कृत्यात  सहभागी असणाऱ्या होत्या , असा

आरोपही फडणवीस यांनी केला. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या शुक्रवारी धुळ्यात प्रचारसभा घेणार आहेत. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज वाशिम आणि अकोला जिल्ह्यात मूर्तिजापूर इथं प्रचारसभा घेतल्या.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या अकोला आणि वाशीम जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसनं आज मुंबईत मतदारसंघनिहाय जाहीरनामा प्रसिद्ध केला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या मासिक रकमेत ६०० रुपयांची वाढ करून पात्र महिलांना २१०० रुपये देण्याचं आश्वासन आणि महायुतीच्या १० वचनांचा समावेश यात आहे.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं घड्याळ हे निवडणूक चिन्ह न्यायप्रविष्ट असल्याचं स्पष्ट करणारं जाहीर प्रकटन ३६ तासांच्या आत मराठीसह इतर भाषांमधल्या वृत्तपत्रांमध्ये ठळक पद्धतीनं छापू, असं आश्वासन पक्षाध्यक्ष अजित पवार यांनी सर्वोच्च न्यायालयाला दिलं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या तोंडी सूचनेनंतर अजित पवार यांचे वकील बलबीर सिंह यांनी पवारांच्या वतीनं ही हमी दिली. विधानसभा निवडणुकीत अजित पवार गटाला घड्याळ चिन्ह वापरण्यापासून रोखण्याची मागणी करणारी याचिका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटानं केली होती,

**//<><><><><>//**